# प्रकरण तिसरे

## राजेंद्रनगर झोपडपट्टीवासियांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी

# प्रकरण तिसरे

## राजेंद्रनगर झोपडपट्टीवासियांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी
## SOCIO-ECONOMIC BACKGROUND OF SLUM DWELLERS

**प्रस्तावना** (INTRODUCTION):

प्रस्तुत प्रकरणात कोल्हापूर शहरातील राजेंद्रनगर झोपडपट्टीतील अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील ८० उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे झोपडपट्टीवासियांच्या व्यक्तिगत, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन आणि विश्लेषण केले आहे.

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील झोपडपट्टीवासियांची व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी वय, लिंग, वैवाहिक दर्जा, शैक्षणिक दर्जा, कुटुंबातील एकूण साक्षर व्यक्ती, कुटुंबातील एकूण शाळेत जाणाऱ्या, न जाणाऱ्या व शाळा मध्येच सोडलेल्या मुलांची संख्या, त्यांचे शाळा मध्येच सोडण्याचे कारण, कुटुंबातील एकूण व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची संख्या, पुरुष व स्त्री सदस्यांचा व्यवसाय, कुटुंबातील बेरोजगार असणाऱ्या व्यक्तींची संख्या, धर्म, जात समुदाय, जात प्रवर्ग, मातृभाषा, कुटुंबाचा प्रकार, कुटुंबातील एकूण सदस्य, कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न, पुरुष व स्त्रियांचे दैनंदिन व मासिक उत्पन्न, कुटुंबाचा सरासरी मासिक खर्च इत्यादी परिवर्त्यासंबंधीच्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण खाली दिले आहे.

**३.१ वय:** (Age)

उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१**

उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | वय | वय प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २३ ते ४५ | तरुण | ३९ | ४८.७५ |
| २ | ४६ ते ६० | मध्यम | ३३ | ४१.२५ |
| ३ | ६० पेक्षा अधिक | वृद्ध | ८ | १०.०० |
| | | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१ मध्ये दिलेल्या माहितीवरुन दिसून येते की, बहुतांश (४८.७५ टक्के) उत्तरदाते तरुण वयोगटातील आहेत. त्याखालोखाल मध्यम वयोगटातील (४१.२५ टक्के) उत्तरदाते असून वयोवृद्ध लोकांचे प्रमाण कमी (१० टक्के) असल्याचे दिसून येते.

**३.२ लिंग :** (Sex)

उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.२ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक ३.२**

उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | उत्तरदात्यांचे लिंग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष | ६० | ७५.० |
| २ | स्त्रिया | २० | २५.० |
| | एकूण | ८० | १००.० |

सारणी क्रमांक ३.२ मध्ये सादर केलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, बहुसंख्य (७५ टक्के) उत्तरदाते हे पुरुष होते. तर उर्वरित २५ टक्के उत्तरदाते ह्या स्त्रिया होत्या.



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

३.३ **मातृभाषा :** (Mother Tongue)

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच (१०० टक्के) उत्तरदात्यांची मातृभाषा मराठी असल्याचे उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरावरुन दिसून आले. विशेष म्हणजे मुसलमान कुटुंबप्रमुखांनी देखील मातृभाषा मराठी असल्याचे सांगितले. सुधा काळदाते आणि बी. एल. जोशी यांनी केलेल्या औरंगाबाद शहरातील झोपडपट्टीच्या अभ्यासामध्ये त्यांना झोपडपट्टीतील बहुतांश व्यक्तींची मातृभाषा मराठी असल्याचे दिसून आले. (Sudha Kaldate and B. L. Joshi, 1989:24)

३.४ **वैवाहिक दर्जा :** (Martital Status)

उत्तरदात्यांचे वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.४ मध्ये दिले आहे.

**सारणी क्रमांक ३.४**

उत्तरदात्यांचे वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | वैवाहिक दर्जा | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | ६८ | ८५.० |
| २ | विधवा | १० | १२.५ |
| ३ | विधूर | २ | २.५ |
| | एकूण | ८० | १००.० |

सारणी क्रमांक ३.४ मधील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, बहुसंख्य (८५.० टक्के) उत्तरदाते विवाहित होते. नमुन्यात विधवा स्त्रियांचे प्रमाणही लक्षणीय (१२.५ टक्के) दिसून आले. उर्वरित दोन उत्तरदाते विधूर होते.

### ३.५ उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थिती :

उत्तरदात्यांचे त्यांच्या शैक्षणिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.५ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.५**

उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | शैक्षणिक दर्जा | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ६५ | ८१.२५ |
| २ | ७ वी पर्यंत | ९ | ११.२५ |
| ३ | ८ वी ते १० वी पर्यंत | ५ | ६.२५ |
| ४ | ११ वी ते १२ वी पर्यंत | १ | १.२५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील बहुसंख्य (८१.२५ टक्के) उत्तरदाते निरक्षर असल्याचे दिसून आले तर केवळ १८.७५ टक्के उत्तरदाते साक्षर होते. त्यातही ज्यांचे अल्प शिक्षण झाले आहे अशांचे प्रमाण अधिक आहे. राजेंद्रनगर झोपडपट्टीतील रहिवाशांमध्ये अशिक्षित आणि अल्पशिक्षितांचा भरणा मोठ्या प्रमाणावर आहे असेच वरील आकडेवारीवरुन सूचीत होते.

प्रतिभा मेहता यांनी केलेल्या अभ्यासामध्ये त्यांना झोपडपट्टीतील लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव असलेला दिसून आले. (Pratibha Mehta: 1998)

### ३.६ कुटुंबाचा प्रकार : (Type of Family)

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.६ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.६**

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | कुटुंबाचा प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विभक्त कुटुंब | ५४ | ६७.५ |
| २ | एकत्र कुटुंब | २६ | ३२.५ |
| | एकूण | ८० | १००.० |

सारणी क्रमांक ३.६ मधील आकडेवारीवरुन दिसून येते की, राजेंद्रनगर झोपडपट्टीत बहुसंख्य (६७.५ टक्के) कुटुंबे विभक्त कुटुंब या प्रकारची तर उर्वरित (३२.५ टक्के) कुटुंबे संयुक्त कुटंब या प्रकारची आहेत.

**३.७ कुटुंबाचा आकार :** (Size of Family)

कुटुंबातील सदस्यांच्या एकूण संख्येनुसार कुटुंबाचा आकार ठरतो. उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या आकारावरुन केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.७ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक : ३.७**

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या आकारानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | कुटुंबाचा आकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मध्यम कुटुंब (६ ते १० सदस्य) | ३८ | ४७.५ |
| २ | लहान कुटुंब (१ ते ५ सदस्य) | ३६ | ४५.५ |
| ३ | मोठे कुटुंब (११ पेक्षा अधिक सदस्य) | ६ | ७.५ |
| | एकूण | ८० | १००.० |

सारणी क्रमांक ३.७ मधील आकडेवारीवरुन निवडलेल्या नमुन्यात ६ ते १० इतकी सदस्य संख्या असणाऱ्या मध्यम आकाराच्या कुटुंबाचे प्रमाण सापेक्षत: अधिक तर त्या खालोखाल लहान कुटुंबाचे प्रमाण असल्याचे आढळले. मोठ्या आकाराची कुटुंबे सापेक्षत: कमीच आढळली. याचे कारण ही उघड आहे. झोपड्या अत्यंत लहान असल्याने त्यात अधिक लोकांचे वास्तव्य असण्याला मर्यादा आहेत. ८० कुटुंबात एकूण ५०२ सदस्य होते. यावरुन प्रत्येक कुटुंबात सरासरी सुमारे ६ सदस्य आहेत. सुधा

काळदाते व बी. एल. जोशी यांनी केलेल्या झोपडपट्टीच्या अभ्यासामध्ये त्यांना बहुतांश कुटुंबामध्ये ४ ते ६ व्यक्ती तसेच एस. सुंदरी यांनी केलेल्या झोपडपट्टीच्या अभ्यासामध्ये त्यांना झोपडपट्टीमध्ये एकाच रुम मध्ये सरासरी ७ ते ९ लोक राहत असल्याचे दिसून आले. (Sudha Kaldate and B. L. Joshi: 1989; S. Sundari: 2003)

### ३.८ कुटुंबातील स्त्री-पुरुष प्रमाण :

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील ८० कुटुंबामध्ये एकूण ५०२ सदस्य आहेत. त्यापैकी २४१ इतके पुरुष सदस्य व २६० स्त्री सदस्य असल्याचे दिसून येते. अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबामध्ये स्त्री सदस्यांची संख्या सापेक्षत: अधिक आहे.

### ३.९ उत्तरदात्यांच्या कुटुंबियांचा शैक्षणिक दर्जा :

उत्तरदात्यांबरोबरच उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे साक्षरतेचे प्रमाण समजून घेण्यासाठी देखील माहिती संकलित केली होती. राजेंद्रनगर झोपडपट्टीतील प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबातील सदस्यांची एकूण संख्या ५०२ आहे त्यातील साक्षर व्यक्तींची संख्या १६४ (३२.६६ टक्के) इतकी आहे. त्यापैकी ८९ (५४.२ टक्के) पुरुष सदस्य साक्षर आहेत तर ७५ (४५.७३ टक्के) स्त्री सदस्य साक्षर आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, झोपडपट्टीतील रहिवाश्यांचे साक्षरतेचे प्रमाण कमी (केवळ ३२.६६ टक्के) असून त्यातही स्त्री-साक्षरतेचे प्रमाण (४५.७३ टक्के) पुरुष साक्षरतेपेक्षा (५४.२ टक्के) कमी आहे.

नमुना निवड केलेल्या कुटुंबातील शाळेत जाणाऱ्या व न जाणाऱ्या मुलामुलींची आकडेवारी संकलित केली होती. ८० कुटुंबातील एकूण शाळेत जाणाऱ्या मुलामुलींची संख्या ७१ इतकी आहे. त्यापैकी ४२ मुले व २९ मुली शाळेत जातात. या ८० कुटुंबातील, शाळेत न जाणाऱ्या मुला-मुलींची संख्या ५५ इतकी आहे. त्यापैकी २५ मुले व ३० मुली आहेत. राजेंद्रनगर झोपडपट्टीमध्ये मुलींना शाळेत पाठविण्याचे प्रमाण सापेक्षत: कमी

असलेले दिसून येते. नमुन्यातील ८० कुटुंबातील शाळा मध्येच सोडलेल्या मुला-मुलींची संख्या ५७ आहे. त्यापैकी २६ मुलांनी व ३१ मुलींनी शाळा मध्येच सोडलेली आहे. इथेही शाळा मध्येच सोडून देण्याच्या बाबतीत मुलींचे प्रमाण सापेक्षत: अधिक असल्याचे दिसून येते.

### ३.१० शाळा मध्येच सोडण्याचे कारण :

मुला-मुलींचे शाळा मध्येच सोडण्याचे कारण यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१० मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१०**

मुला-मुलींचे शाळा मध्येच सोडण्याचे कारण दर्शवणारी सारणी

| अ. क्र. | शाळा मध्येच सोडण्याचे कारण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दारिद्र्य / पैशाचा अभाव | १७ | २१.२५ |
| २ | आजारपण / वडिलांचा मृत्यू | ३ | ३.७५ |
| ३ | घरामध्ये काम | २ | २.५ |
| ४ | लागू होत नाही | ५८ | ७२.५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१० मध्ये दिलेल्या माहितीवरुन दिसून येते की, बहुसंख्य (२१.२५ टक्के) मुलांना दारिद्र्य आणि पैशाचा अभाव या मुख्य कारणांमुळे शाळा मध्येच सोडून देणे भाग पडले आहे. मुलांचे आजारपण, वडिलांचा मृत्यू आणि घरकाम ही देखील मुलींनी शाळा मध्येच सोडण्यास जबाबदार असणारी अन्य कारणे आहेत.

### ३.११ कुटुंबातील सदस्यांची व्यवसायविषयक माहिती :

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील ८० कुटुंबातील व्यवसायात गुंतलेल्या एकूण व्यक्तींची संख्या १६५ इतकी आहे. त्यापैकी १३८ पुरुष सदस्य व २७ स्त्री सदस्य आहेत. यावरुन चरितार्थासाठी अर्थार्जन ही प्रामुख्याने पुरुषांचीच जबाबदारी आहे आणि घरकाम ही प्रामुख्याने स्त्रियांची जबाबदारी आहे असा

दृष्टीकोन झोपडपट्टीवासियांत असावा असे सूचित होते. कदाचित, स्त्रियांना अर्थार्जनासाठी कोणते तरी काम उपलब्ध होत नसण्याची देखील शक्यता आहे. त्यामुळेच व्यवसायात गुंतलेल्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी दिसत असावे.

पुरुष आणि स्त्रिया कोणकोणते व्यवसाय करतात या विषयी ही माहिती संकलित केली होती. यावरुन असे आढळून आले की, कुशल आणि अकुशल बांधकाम मजूर, हमाली करणारे, हातगाडीवरुन फळे किंवा इतर वस्तू विकणारे, ड्रायव्हर इत्यादी व्यवसायात बहुसंख्य पुरुष गुंतलेले होते, तर धुणी-भांडी करणारी मोलकरीण, अकुशल बांधकाम मजूर, हातगाडीवरुन माल विकणे, भंगार गोळा करणे इत्यादी व्यवसायात बहुसंख्य स्त्रिया गुंतलेल्या आहेत.

बहुसंख्य (८५ टक्के) पुरुष सदस्यांचे दैनंदिन उत्पन्न ५१ ते १०० रुपयांपर्यंत आहे तर बहुसंख्य (२१.२५ टक्के) स्त्री सदस्यांचे दैनंदिन उत्पन्न फक्त ३० रुपयांपर्यंत आहे.

**३.१२ रोजगाराच्या साधनांची उपलब्धता :**

कुटुंबातील व्यक्तींना काम हवे असते पण काम किंवा रोजगार मिळत नाही, अशा किती व्यक्ती कुटुंबामध्ये आहेत याबद्दलही माहिती मिळविली होती. त्यावरुन ८० कुटुंबातील एकूण १४० व्यक्तींना आपली उपजिविका भागविण्यासाठी काम हवे असते परंतु त्यांना रोजगाराचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्याचे दिसून आले. आधीच आर्थिक स्थिती कमकुवत असलेल्या या झोपडपट्टीवासियांना रोजगार उपलब्ध नसलेल्या आपल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा भार सोसावा लागतो. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती आणखीनच खालावत जाते.

**३.१३ धर्म :** (Religion)

उत्तरदात्यांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१३ मध्ये सादर केले आहे.

### सारणी क्रमांक ३.१३

उत्तरदात्यांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | उत्तरदात्यांचा धर्म | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ७३ | ९१.२५ |
| २ | मुस्लिम | ७ | ८.७५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१३ मध्ये सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते की, बहुसंख्य (९१.२५ टक्के) झोपडपट्टीवासिय हिंदू धर्माचे तर ८.७५ टक्के लोक मुस्लिम धर्मीय आहेत.

**३.१४ जात / समुदाय :** (Caste/Community)

उत्तरदात्यांचे जात/समुदाय यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१४ मध्ये दर्शविले आहे.

### सारणी क्रमांक ३.१४

उत्तरदात्यांचे जात/समुदाय यानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | जात/समुदाय | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महार | ३९ | ४८.७५ |
| २ | मांग | १४ | १७.५ |
| ३ | मराठा | ११ | १३.७५ |
| ४ | मुसलमान | ७ | ८.७५ |
| ५ | ढोर | २ | २.५ |
| ६ | लिंगायत | २ | २.५ |
| ७ | चांभार | १ | १.२५ |
| ८ | रामोशी | १ | १.२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | बुरुड | १ | १.२५ |
| १० | खाटीक | १ | १.२५ |
| ११ | धनगर | १ | १.२५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१४ मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार राजेंद्रनगर झोपडपट्टीतील निवडलेल्या नमुन्यात महार जातीच्या रहिवाशांचे प्रमाण सर्वाधिक (४८.७५ टक्के) असून त्या खालोखाल मांग जातीचे (१७.५ टक्के), मराठा जातीचे (१३.७५ टक्के) रहिवाशी आहेत. ८.७५ टक्के सदस्य मुसलमान होते. चांभार, रामोशी, बुरुड, खाटीक व धनगर जातीचा प्रत्येकी एक सदस्य तर ढोर आणि लिंगायत जात/समुदायाचे प्रत्येकी दोन सदस्य दिसून आले. बहुसंख्य सदस्य विविध मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत म्हणून जात प्रवर्गानुसार त्यांचे प्रमाण पहाणे उचित ठरेल.

**३.१५ जात प्रवर्ग** : (Caste Category)

उत्तरदात्यांचे जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१५ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१५**

उत्तरदात्यांचे जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | जात प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एस. सी. | ५७ | ७१.२५ |
| २ | ओपन | ११ | १३.७५ |
| ३ | ओ. बी. सी. | १० | १२.५ |
| ४ | डी. टी./एन. टी. | २ | २.५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१५ मधील आकडेवारीनुसार दिसून येते की, बहुसंख्य (८६.२५ टक्के) झोपडपट्टीवासिय सामाजिक, आर्थिकदृष्ट्या विविध मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत. त्यातही अनुसूचित जातींच्या सदस्यांचे प्रमाण सर्वाधिक (७१.२५ टक्के) असून उर्वरित सदस्य अनुक्रमे ओ. बी. सी. (१२.५ टक्के) डी. टी. आणि एन. टी. (२.५ टक्के) प्रवर्गातील आहेत. झोपडपट्टीवासियांत खुल्या प्रवर्गातील १३.७५ टक्के इतकेच सदस्य आढळून आले. ग्रामीण भागातील पारंपारिक बलुतेदारी व्यवस्था मोडकळीस आल्यामुळे उदरनिर्वाहाच्या शोधात लोक शहरात स्थलांतरित होतात. आधीच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने अशा स्थलांतरितांना झोपडपट्टीत आश्रय घ्यावा लागतो. खुल्या प्रवर्गातील लोकांनाही बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शहरातील अन्य चांगल्या वस्तीमध्ये जागा मिळत नाही. त्यामुळे अशा लोकांनाही झोपडपट्टीत आश्रय घ्यावा लागतो, असे वरील आकडेवारीवरुन सूचित होते.

डी. वासुदेवाराव यांनी केलेल्या अभ्यासामध्ये त्यांना झोपडपट्टीमध्ये अनुसूचीत जातीच्या सदस्यांचे प्रमाण जास्त आहे.(D Vasudeva Rao: 1991:30)

**३.१६ उत्तरदात्यांच्या कुटुंबाचा आर्थिक दर्जा :**

कुटुंबाचे मासिक उत्पन्न व मासिक खर्च यावरुन कुटुंबाच्या आर्थिक दर्जाविषयी अनुमान काढता येते. प्रथम आपण मासिक उत्पन्न विषयक आकडेवारी पाहू. उत्तरदात्यांचे कुटुंबातील एकूण मासिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१६ मध्ये दर्शविलेले आहे.

**सारणी क्रमांक-३.१६**

उत्तरदात्यांचे कुटुंबातील एकूण मासिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | मासिक उत्पन्न | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २५०१ ते ५००० रुपयांपर्यंत | ५३ | ६६.२५ |
| २ | २५०० रुपयांपर्यंत | १९ | २३.७५ |
| ३ | ५००१ ते ७५०० रुपयांपर्यंत | ६ | ७.५ |
| ४ | ७५०१ ते ९६०० रुपयांपर्यंत | २ | २.५ |
| | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१६ मधील आकडेवारीनुसार असे दिसून येते की, बहुसंख्य (६६.२५ टक्के) कुटुंबाचे मासिक उत्पन्न २५०१ ते ५००० रुपयांपर्यंत आहे. त्या खालोखाल २३.७५ टक्के झोपडपट्टीवासियांचे मासिक उत्पन्न २५०० रुपयांपर्यंत आहे. फक्त १० टक्के झोपडपट्टीवासियांचे मासिक उत्पन्न ५००० रुपयांपेक्षा अधिक असलेले दिसून येते. झोपडपट्टीवासियांच्या मासिक उत्पन्नाच्या तुलनेत त्यांना आपल्या कुटुंबियांच्या गरजा भागविण्यासाठी करावा लागणारा खर्च पाहणे उचित ठरेल.

**३.१७ कुटुंबाचा सरासरी मासिक खर्च :**

उत्तरदात्यांचे कुटंबाच्या सरासरी मासिक खर्चानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१७ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१७**

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या सरासरी मासिक खर्चानुसार केलेले वर्गीकरण

| अ. क्र. | मासिक खर्च | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २५०१ ते ५००० रुपयांपर्यंत | ५६ | ७०.० |
| २ | ५००० रुपयांपर्यंत | १६ | २०.० |
| ३ | ५००१ ते ७५०० रुपयांपर्यंत | ६ | ७.५ |
| ४ | ७५०१ ते ९३५० रुपयांपर्यंत | २ | २.५ |
| | एकूण | ८० | १००.० |

सारणी क्रमांक ३.१७ नुसार प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील झोपडपट्टीवासियांपैकी बहुसंख्य (७०.० टक्के) झोपडपट्टीवासियांचा मासिक खर्च २५०१ ते ५००० रुपयांपर्यंत आहे. त्या खालोखाल २०.० टक्के झोपडपट्टीवासियांचा मासिक खर्च  २५०० रुपयांपर्यंत आहे. फक्त १० टक्के लोकांचा मासिक खर्च ५००० रुपयांपेक्षा जास्त आहे.

कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न आणि खर्च यासंबंधीच्या आकडेवारीचा तुलनात्मक विचार केल्यास राजेंद्रनगरमधील झोपडपट्टीवासिय उत्पन्न आणि खर्च यांचा कसाबसा मेळ घालून उदरनिर्वाहविषयक गरजा भगवितात असे दिसून येते.

बहुसंख्य झोपडपट्टीवासियांची आर्थिक स्थिती चांगली नाही. उत्पन्न अतिशय कमी असल्याने त्यांना चांगल्या वस्तीत राहता येत नाही. तसेच उच्च आणि मध्यमवर्गीय लोकांसारखे जीवन जगता येत नाही. मूलत:च गरीब असलेल्या या झोपडपट्टीवासियांना अल्प उत्पन्न आणि वाढत्या महागाईमुळे होणारा भरमसाठ खर्च याचा मेळच बसविता येणे कठीण होत असल्याचे दिसून येते.

### ३.१८ उत्तरदात्यांचा विविध बाबींवर होणारा मासिक खर्च :

उत्तरदात्यांचा विविध बाबींवर होणाऱ्या मासिक खर्चावरुन केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१८ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक ३.१८**

उत्तरदात्यांचा विविध बाबींवर होणारा मासिक खर्च दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | खर्चाची बाब | होणारा मासिक खर्च रुपयांमध्ये | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अन्नधान्यावर होणारा खर्च (Expenditure on Cereals) | १५०१ ते ३००० रुपयांपर्यंत | ५८ | ७२.५ |
| | | १५०० रुपयांपर्यंत | १३ | १६.२५ |
| | | ३००१ ते ४५०० रुपयांपर्यंत | ८ | १०.० |
| | | ४५०१ ते ५९०० रुपयांपर्यंत | १ | १.२५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| २ | लाईट व पाणी बिलावर होणारा खर्च (Expenditure on Electricity and Water Bill) | ३०१ ते ६०० रुपयांपर्यंत | ३६ | ४५.० |
| | | ३०० रुपयांपर्यंत | ३० | ३७.५ |
| | | ६०१ ते ८०० रुपयांपर्यंत | ४ | ५.० |
| | | लागू होत नाही | १० | १२.५ |
| | | एकूण | ८० | १००.० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च (Expenditure on Education) | १०० रुपयांपर्यंत | २३ | २८.७५ |
| | | १०१ ते २०० रुपयांपर्यंत | ४ | ५.० |
| | | २०१ ते ३०० रुपयांपर्यंत | १ | १.२५ |
| | | लागू होत नाही | ५२ | ६५.० |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| ४ | दवाखाना/औषधांवर होणारा खर्च (Expenditure on Drug and Medicienes) | २०० रुपयांपर्यंत | ६० | ७५.० |
| | | २०१ ते ४०० रुपयांपर्यंत | १८ | २२.५ |
| | | २०१ ते ३०० रुपयांपर्यंत | १ | १.२५ |
| | | लागू होत नाही | १ | १.२५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| ५ | वाहन/वाहतुकीवर होणारा खर्च (Expenditure on Motor/Traveling ) | २५० रुपयांपर्यंत | ५३ | ६६.२५ |
| | | २५१ ते ५०० रुपयांपर्यंत | १८ | २२.५ |
| | | ७५१ ते १००० रुपयांपर्यंत | ३ | ३.७५ |
| | | लागू होत नाही. | ६ | ७.५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| ६ | करमणुकीवर होणारा खर्च Expenditure on Entertainment | १०० रुपयांपर्यंत | २७ | ३३.७५ |
| | | १०१ ते २०० रुपयांपर्यंत | १३ | १६.२५ |
| | | २०१ ते ४०० रुपयांपर्यंत | १ | १.२५ |
| | | लागू होत नाही | ३९ | ४८.७५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| ७ | सण उत्सवावर होणारा खर्च (Expenditure on Ceremonies/Festivals) | १०० रुपयांपर्यंत | ६५ | ८१.२५ |
| | | १०१ ते २०० रुपयांपर्यंत | १२ | १५.० |
| | | २०१ ते ४०० रुपयांपर्यंत | १ | १.२५ |
| | | लागू होत नाही | २ | २.५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |
| ८ | इतर खर्च Expenditure on Other | ३०० रुपयांपर्यंत | ४७ | ५८.७५ |
| | | ३०१ ते ६०० रुपयांपर्यंत | २२ | २७.५ |
| | | ६०१ ते १००० रुपयांपर्यंत | ९ | ११.२५ |
| | | लागू होत नाही | २ | २.५ |
| | | एकूण | ८० | १००.०० |

सारणी क्रमांक ३.१८ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरुन दिसून येते की,

१. बहुतांश (७२.५ टक्के) कुटुंबाचा अन्नधान्यावरील मासिक खर्च १५०१ ते ३००० या दरम्यान आहे.

२. बहुतांश (४५ टक्के) कुटुंबाचा लाईट व पाणी बिलावरील मासिक खर्च ३०१ ते ६०० या दरम्यान आहे.

३. बहुतांश (२८.७५ टक्के) कुटुंबाचा मुलांच्या शिक्षणावरील मासिक खर्च १०० रुपयांपर्यंत होताना दिसून येतो.

४. बहुतांश (७५ टक्के) कुटुंबाचा दवाखाना व औषधांवरील मासिक खर्च २०० रुपयांपर्यंत आहे.

५. बहुतांश (६६.२५ टक्के) कुटुंबाचा वाहन व वाहतुकीवरील मासिक खर्च २५० रुपयांपर्यंत आहे.

६. बहुतांश (३३.७५ टक्के) कुटुंबाचा करमणुकीवर मासिक खर्च १०० रुपयांपर्यंत होताना दिसून येते.

७. बहुतांश (८१.२५ टक्के) कुटुंबाचा सण उत्सवावर होणारा मासिक खर्च १०० रुपयांपर्यंत होताना दिसून येतो.

८. बहुतांश (५८.७५ टक्के) कुटुंबाचा इतर खर्च ३०० रुपयांपर्यंत होतो. इतर खर्चामध्ये राजेंद्रनगर झोपडपट्टीतील अभ्यासासाठी निवडलेल्या ८० कुटुंबातील सदस्यांच्या व्यसनांवर होणाऱ्या खर्चाचा समावेश केला आहे.

**३.१९ राजेंद्रनगर झोपडपट्टीतील एका झोपडपट्टीवासियाचे सरासरी मासिक उत्पन्न, खर्च व खर्चाची विविध घटकांवरील विभागणी :**

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील अभ्यासासाठी निवडलेल्या ८० कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न ३५१८.७५ इतके असून त्यांचा सरासरी मासिक खर्च ३५०१.१३ इतका आहे.

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील ८० कुटुंबाच्या माहितीच्या आधारे काढलेल्या एका झोपडपट्टीवासियांच्या सरासरी मासिक खर्चाची विविध घटकांवरील विभागणी सारणी क्रमांक ३.१९ मध्ये दर्शविली आहे.

**सारणी क्रमांक : ३.१९**

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील एका झोपडपट्टीवासियाच्या सरासरी मासिक खर्चाची विविध घटकांवरील विभागणी दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | खर्चाची बाब | कुटुंबाचा सरासरी खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अन्नधान्यावर होणारा खर्च | २२४५.६३ | ६४.१४ |
| २ | लाईट/पाणी बिलावर होणारा खर्च | ३३५.५० | ९.५८ |
| ३ | इतर खर्च | ३५०.०० | ९.९९ |
| ४ | वाहन/वाहतुकीवरील खर्च | २००.०० | ५.७१ |
| ५ | दवाखाना/ औषधांवरील खर्च | १५७.५० | ४.४९ |
| ६ | सण/ उत्सवावरील खर्च | १०५.६३ | ३.०१ |
| ७ | करमणूकीवरील खर्च | ६०.६३ | १.७३ |
| ८ | मुलांच्या शिक्षणवरील खर्च | ३७.५० | १.०७ |
|  | एकूण | ३४९२.३९ | ९९.७२ |

राजेंद्रनगर झोपडपट्टीतील निवडलेल्या नमुन्यातील ८० कुटुंबाच्या सरासरी मासिक खर्चाच्या आकडेवारीच्या आधारे एका कुटुंबाचा कोणत्या घटकावर सरासरी किती मासिक खर्च होतो याची आकडेवारी सारणी क्रमांक ३.१९ मध्ये सादर केली आहे. त्यावरुन खालील ठळक निष्कर्ष समोर येतात.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१) राजेंद्रनगर झोपडपट्टीतील कुटुंबाचा सर्वात अधिक खर्च (६४.१४ टक्के) जीवनावश्यक गरजांच्या पूर्तीसाठी होतो. म्हणजे झोपडपट्टीतील लोक निर्वाह पातळीवरच जीवन जगत आहेत.

२) निर्वाह विषयक गरजांनतर इतर खर्च, की ज्यामध्ये व्यसनावरील खर्च अंतर्भूत केला आहे तो लक्षणीय आहे (सुमारे १० टक्के) म्हणजे व्यसनाधिनतेचे प्रमाण झोपडपट्टीवासियात अधिक असून त्यांच्या उत्पन्नातील लक्षणीय वाटा व्यसनावर खर्च होताना दिसून येतो.

३) शहरात वाहन-वाहतुकीवरील खर्च ही अत्यावश्यक बाब मानली पाहिजे. त्यावर प्रत्येक कुटुंब सरासरी ५.७ टक्के खर्च करते. कामधंद्यानिमित्त हा प्रवास होतो.

४) दवाखाना व औषधांवरील खर्च ही लक्षणीय प्रमाणात होणारा खर्च आहे. हा खर्च ४.४९ टक्के आहे. हा खर्च त्यांना झोपडपट्टीतील अस्वच्छ पर्यावरणामुळे व त्यांना होणाऱ्या रोगामुळे करावा लागतो. झोपडपट्टीतील सार्वजनिक स्वच्छता अधिक चांगली करुन मूलभूत सुविधा निर्माण करुन या खर्चाचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे.

५) नोंद घेण्यासारखी आणखी एक बाब म्हणजे झोपडपट्टीवासियांचा मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च सर्वात कमी व अगदी नगन्य आहे (१.०७ टक्के) यासाठी झोपडपट्टीवासियांच्या शैक्षणिक विकासासाठी खास कार्यक्रम शासनाने राबविण्याची आवश्यकता आहे.

**३.२० कर्ज :**

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील झोपडपट्टीवासियांपैकी १५ (१८.७५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी कर्ज घेतलेले आहे. त्यापैकी ७ किंवा (८.७५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी बँकेकडून, ५ किंवा (६.२५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी पाहुण्यांकडून, ३ (३.७५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले आहे.

कर्ज कोणत्या कारणासाठी घेतले आहे या बद्दलची माहितीही मिळविली होती. अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील झोपडपट्टीवासियांपैकी बहुसंख्य ९(११.२५ टक्के) उदरनिर्वाहविषयक झोपडपट्टीवासियांनी धंद्यासाठी कर्ज घेतले आहे. त्याखालोखाल ३ (३.७५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी दवाखाना व औषधांवरिल खर्चासाठी कर्ज घेतले आहे. तर दोन (२.५ टक्के) झोपडपट्टीवासियांनी घरासाठी व एका (१.२५) झोपडपट्टीवासियांने लग्नासाठी कर्ज घेतले आहे. असे उपलब्ध माहितीवरुन दिसून आले.

### ३.२१ झोपडपट्टी सोडून चांगल्या वस्तीत राहावयास जावे असे वाटते काय?

नमुन्यामध्ये निवडलेल्या ८० झोपडपट्टीवासियांना आपणास झोपडपट्टी सोडून अन्यत्र चांगल्या वस्तीत रहावयास जावे असे वाटते काय? असा प्रश्न विचारला होता. उत्तरादाखल मिळालेल्या माहितीवरुन स्पष्ट होते की, नमुन्यामध्ये निवडलेल्या सर्व झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी सोडून इतरत्र रहावयास जावे असे वाटत नाही. हे आश्चर्यकारक नाही याची करणमीमांसा पुढीलप्रमाणे : नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरामधून या झोपडपट्टीमध्येच का रहावेसे वाटते या बाबतच्या ठळक बाबी पुढील प्रमाणे दिसून येतात.

१) झोपडपट्टी सोडून अन्यत्र चांगल्या वस्तीत घर घेणे किंवा जागा घेऊन घर बांधणे परवडत नाही.

२) आर्थिक स्थिती बेताची असल्याने जमा-खर्चाचा मेळच बसत नाही.

३) घरामध्ये कमावणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी व त्यावर उपजिविका करणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

४) रोज रोजगार मिळत नाही तसेच चांगल्या प्रकारचे अर्थार्जन मिळून देणाऱ्या रोजगाराचा अभाव आहे. मिळालेल्या रोजगारातून मिळणारे उत्पन्न अत्यंत तुटपुंजे आहे. या उत्पन्नातून घरखर्च भागवून बचत होणे मुश्किल आहे.

५) बहुतांश व्यक्ती ह्या सुरुवातीपासूनच झोपडपट्टीमध्ये राहत आहेत त्यामुळे ते झोपडपट्टीतील वातावरणाशी एकरुप झाले आहेत.

६) या झोपडपट्टीमध्ये शहरातील इतर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन केले आहे व या झोपडपट्टीमधील घरे झोपडपट्टीवासियांच्या मालीकीची आहेत. त्यामुळे ते याच झोपडपट्टीमध्ये राहणे पसंत करतात. ज्यांना इतरत्र घर घेणे परवडत नाही त्यांना या झोपडपट्टीमध्ये स्वस्तात घर विकत मिळाले आहे.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## संदर्भ

**Reference:**


1. Kaldate Sudha and B.L.Joshi (1989): 'Slums and Housing Problems', Printwell Publishers, Jaipur.
2. Mehta Pratibha (1998): 'Action For Securing Health For All'dwonloaded http://www.megacitiesproject.org/publications.pdf/mcp018h.pdf
3. Sundari S. (2003): 'Quality of Life of Migrant Households in Urban Slums', downloaded from, http://www.yorku.ca/bunchmj/ICEH/proceedings/Sundari_S_ICEH_papers_537to552.pdf
4. Rao D.Vasudeva (1991): 'Genral Household Survey', (Ed), Bijlani H.U. and Prodipto Roy 'Slum Habitat: Hyderabad Slum Improvement Project', Vikas Publishigh House Pvt. Ltd., New Delhi.